अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील विविध शासकीय/ अशासकीय अनुदानीत व विना अनुदानीत संस्थेमधील प्रवेश क्षमतेमध्ये झालेले बदल, अभ्यासक्रम पुढे चालू ठेवणे, तसेच टयुशन फी वेव्हर योजनेखाली १०% इतक्या अतिरिक्त प्रवेश क्षमतेस मान्यता देण्याबाबत, शैक्षणिक वर्ष २००९-२०१० करीता,

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.मान्यता २००९/(३१४/०९)/तांशि ५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ३० जून,२००९.

संदर्भ :- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम क्षेत्रिय कार्यालय, मुंबई, यांचे क्र.एफ नं.७४०-८९-११९ (ई) आर.सी./९४ १९०/टिएनडीई १५४७, दि.२९ जून,२००९ चे पत्र.

**शासन निर्णय** : अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने, त्यांच्या संदर्भाधिन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २००९-२०१० करीता सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या एकूण २१७ शासकीय / अशासकीय अनुदानित, विना अनुदानीत तंत्र निकेतनांमधील प्रवेश क्षमतेमध्ये झालेले बदल, टयुशन फी वेव्हर योजनेखाली १०% इतकी अतिरिक्त प्रवेश क्षमता आणि अभ्यासक्रम पुढे सुरु ठेवण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

२. आता या शासन निर्णयाव्दारे सोबतच्या विवरणपत्र 'अ' येथील स्तंभ २ मध्ये दर्शविलेल्या संस्थांना स्तंभ ३ व ५ मध्ये नमूद केलेले अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेमधील बदल आणि स्तंभ ६ मध्ये दर्शविलेल्या टयुशन फी वेव्हर या योजनेखाली १०% अतिरिक्त प्रवेश क्षमतेस खालील अटी व शर्तींवर शैक्षणिक वर्ष २००९-२०१० करीता शासन याव्दारे मान्यता देत आहे.

१. शासकीय तंत्र निकेतनांखेरीज उर्वरित सर्व संस्थांना वरील नवीन अभ्यासक्रम/ प्रवेश क्षमतेमधील बदल इत्यादी कायम विना अनुदानीत तत्वावर राहिल.
२. वरील मान्यता एसएलपी क्रमांक १२३६८/२००९ मधील निर्णयाच्या अधिन राहिल.
३. सदर अभ्यासक्रमांसाठी संस्थेची प्रवेश क्षमता सोबतच्या विवरणपत्र 'अ' मध्ये दर्शविलेल्या स्तंभ ५ व ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहिल.
४. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टिईएम ३३८२/११९८३६/(१९०)/तांशि १(अ), दिनांक २१ मे,१९८३ अन्वये विना अनुदान तंत्र शिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील.
५. सर्व संस्थांना अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचायांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचायांच्या वेतन व भत्ते, इत्यादीबाबत तसेच, विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.
६. ज्या अशासकीय अनुदानीत संस्थेकरीता तीन किंवा त्यापेक्षा जास्त विना अनुदानित तत्वावर अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे, त्या संस्थांनी विना अनुदानीत अभ्यासक्रम शाखेकरीता स्वतंत्र प्राचार्य व शिक्षकीय व शिक्षकेतर कर्मचारी नेमणे व आवश्यक ती यंत्रसामुग्री, सोयी सुविधा स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहिल.

D:\s.o.t.e.-5\admission\wadh-ghat-stat.doc



To O.S.
For Record

७. शासनाने विहित केलेल्या तसेच, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच, संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, यांच्या संम्मतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

८. सदर पदविका अभ्यासक्रमासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे.

९. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई, यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

१०. सदर संस्था संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई, यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्सासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई, यांच्याकडून घेतल्या जातील.

११. सदर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पध्दतीनुसार करण्यात येतील.

१२. शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट,१९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

१३. रँगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रँगिंग अॅक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१४. याशिवाय संचालक, तंत्रा शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१५. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे किंवा नवीन अटी व शर्ती अंतर्भूत करण्याचे अधिकार शासनाचे राहतील.

३. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००९०७१६१७०४३०००१, आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(व्यं. ह. कुलकर्णी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/नाशिक/अमरावती/औरंगाबाद.
संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, शासकीय तंत्र निकेतन इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई.
संबंधित संस्था.

प्रत माहितीसाठी :

अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११० ००१.
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई २०.
निवड नस्ती / तांशि ५.

## विवरणपत्र 'अ'

राज्यातील शैक्षणिक वर्ष २००९-१० करिता विविध शासकीय/अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित अस्तित्वात असलेल्या तंत्रनिकेतनामधील अभ्यासक्रमात/प्रवेशक्षमतामध्ये झालेले बदल आणि टयूशन फी वेव्हर योजनेखाली १०% इतक्या अतिरिक्त प्रवेश क्षमतेसह अभ्यासक्रम पुढे चालू ठेवण्यास (ईओए) मान्यता देण्यात आलेला तपशिल दर्शविणारा तक्ता.

## "पुणे विभाग"

| अ. क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | सध्या अस्तित्वात असलेले अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता २००८-०९ | प्रवेश क्षमता २००९-१० | १०% अतिरिक्त प्रवेशा क्षमता, टयुशन फी वेव्हर स्किम २००९-१० | अ.भा.तं.शि. परिषदेने मान्यता दिलेले पत्र क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ | ६ |
| १ | श्री पांडूरंग प्रतिष्ठान कर्मयोगी पॉलि. कॉलेज, गेट नं.१२४, १२५ ए/पी, शेल्वे, ता.पंढरपूर, सोलापूर | कॉम्प्यूटर टेक्नॉ. | ६० | ६० | ० | F-No.22-2756/ 2008 (175/ TMDE-2756), Dt.29-6-09 |
| | | इले.अँड टेलि. इंजि. | ६० | ६० | ० | |
| | | इन्फरमेशन टेक्नॉ. | ६० | ६० | ० | |
| | | मेकॅनिकल इंजि. | ६० | १२० | ० | |
| | | सिव्हील इंजि. | ६० | ६० | ० | |
| २ | विद्या विकास प्रतिष्ठान पॉलि., सर्व्हे नं.७२/२ बी, प्रतापनगर, (सोरगांव), सोलापूर ४१३ ००४ | कॉम्प्यूटर टेक्नॉ. | ६० | ० | ० | F-No.22-2621/ 2007 (213/ TMDE-2621), Dt.29-6-09 |
| | | इले.अँड टेलि. इंजि. | ६० | ६० | ० | |
| | | कॉम्प्यूटर इंजि. | ९० | ९० | ० | |
| | | मेकॅनिकल इंजि. | ९० | ९० | ० | |
| | | इन्फरमेशन टेक्नॉ. | ६० | ६० | ० | |
| | | इलेक्ट्रिकल इंजि. | ० | ६० | ० | |
| ३ | श्री साई चॅरिटेबल ट्रस्ट इंदिरा इन्स्टि.ऑफ डिप्लोमा इंजिनिअरींग, फ्लॅट नं.६७, ए/पी.सासुर (वैराग), ता.बार्शी, जि.सोलापूर | इन्फरमेशन टेक्नॉ. | ६० | ३० | ० | F-No.22-2753/ 2008 (188/ TMDE-2753), Dt.29-6-09 |
| | | इलेक्ट्रॉनिक्स इंजि. | ६० | ६० | ० | |
| | | मेकॅनिकल इंजि. | ६० | ९० | ० | |
| | | कॉम्प्यूटर इंजि. | ६० | ६० | ० | |
| | | इले.अँड टेलि. इंजि. | ६० | ६० | ० | |
| ४ | शांती एज्युकेशन सोसायटी ए.एस. पाटील पॉलि.इन्स्टि.,१८/ (२ए२) प्रताप नगर, सोरगावणे, ता.नॉर्थ सोलापूर, जि.सोलापूर | कॉम्प्यूटर इंजि. | ६० | ६० | ० | F-No.22-2749/ 2008 (167/ TMDE-2749), Dt.29-6-09 |
| | | इले.अँड टेलि. इंजि. | ६० | ६० | ० | |
| | | इन्फरमेशन टेक्नॉ. | ६० | ६० | ० | |
| | | मेकॅनिकल इंजि. | ६० | ६० | ० | |
| ५ | कै.आमदार ब्रम्हदेव दादा माने ब्रम्हदेवदादा माने पॉलि., बेताली, ता.नॉर्थ सोलापूर, सोलापूर ४१३ ००२ | कॉम्प्यूटर टेक्नॉ. | ६० | ६० | ० | F-No.22-2752/ 2008 (97/ TMDE-2752), Dt.29-6-09 |
| | | इले.अँड टेलि. इंजि. | ६० | ६० | ० | |
| | | इन्फरमेशन टेक्नॉ. | ६० | ६० | ० | |
| | | मेकॅनिकल इंजि. | ६० | ६० | ० | |
| | | इलेक्ट्रिकल इंजि. | ६० | ६० | ० | |
| | | सिव्हील इंजि. | ० | ६० | ० | |